# Marathi Guess Paper According Latest Guideline Of CBSE

१. (अ)पुढीलपैकी कोणतीही पाच वाक्ये कंसातील सूचनाप्रमाणे बदलून पुन्हा लिहा. ५

१)ती पडकी भिंत पूर्ण पडली होती. ('भिंत' ऐवजी घर हा शब्द वापरा)
२)फुकट दिलं तर कोण नको म्हणेल? (नकारार्थी करा)
३)मला आपलं वाटतं. मी नुसता टवाळकी करतो. (दोन्ही वाक्ये जोडून एक वाक्य बनवा.)
४)कोणी कोणाशी बोलत नव्हते. (वाक्य प्रश्नार्थक करा )
५)काय उकडले हो काल रात्री! (विधानार्थी करा )
६)सामान ऑफिसमध्ये ठेवले. (आज्ञार्थी करा)

(ब) पुढीलपैकी कोणतीही पाच वाक्यांचा काळ कंसातील सूचनाप्रमाणे बदलून ती वाक्ये पुन्हा लिहा. ५

१) अशा वेळी मी शांत राहणे कसे शक्य होते? (वर्तमानकाळ करा.)
२) माणसे दगावली तेव्हा एकच गोंधळ उडाला. (भविष्यकाळ करा.)
३) पुस्तके बहुमोल असून तप्त मनाला समाधान देतात. (भूतकाळ करा.)
४) धावपट्टीवरून विमानाने आकाशात झेप घेतली. (भविष्यकाळ करा.)
५) त्या दिवशी आईबाबांचे भांडण झाले. (वर्तमानकाळ करा.)
६) पुढच्या दिवाळीत मी तुझ्याकडे नागपूरला येईन. (भूतकाळ करा.)

क)पुढीलपैकी कोणतीही पाच वाक्ये शुद्धलेखनाच्या चूका दुरूस्त करून वाक्ये पुन्हा लिहा. ५

१.आमच्या कारकान्यात मानासाची गरज नायी.
२.एखदा खुप मुसळधार पाउस पडला.
३.सूटीच्या दीवशी मि माज्या आजीकडे जायची.
४.आर्ध्यातवा पाउस बरसला.
५.कदी कदी माजच मला आश्शर्चय वाटतं.
६.या वरशी देवाची जतरा चागली भरल.

२. अ)पुढीलपैकी <u>कोणत्याही एका</u> विषयावर निबंध लिहा. १०

१) अंधश्रद्धा-एक शाप की वरदान
२) फाशीची शिक्षा असावी की नसावी
३) प्रयत्न हाच परमेश्वर
४)आजचा विदयार्थी- ज्ञानार्थी की परीक्षार्थी

ब) आकाशवाणी केंद्र पाहण्यासाठी तुम्ही शैक्षणिक सहल आयोजित केली आहे त्यासाठी केंद्र संचालकाकडे

चौकशी करणारे पत्र लिहा. ८

किंवा

रंगीत कागदाची मागणी करणारे पत्र सरस्वती बुक डेपो,पुणे यांना लिहा.

३.पुढील उता-याचा सारांश मूळ उता-याच्या एक तृतीयांश शब्दात लिहा. ७

सुखाच्या शोधात मानव असताना याच शतकात दोन महायुद्धे झाली.असंख्य माणसे त्यात रगडली गेली.रक्ताच्या नदया वाहिल्या.सबंध मानवजात त्यात होरपळून निघाली.तरीही अज्ञानी, संकुचित वृत्तीच्या मानवजातीला यातून काहीच धडा मिळाला नाही.त्यामुळे तिसरे महायुद्ध कधी येऊन कोसळेल याचे अचूक अनुमान जरी करता आले नाही तरी शक्यता टाळता येत नाही व त्यामुळे तो चिंतातूर झाला आहे.त्याचे मन:स्वास्थ्य बिघडले आहे.मनाची शांती ढळली आहे.सुखाचा शोध लावणे त्याला अशक्य होऊन गेले आहे इतिहासात युद्धाचे नगारे पिटवले त्याचे दाखले मिळतात, यश-अपयश यांचा आढावा घेतला जातो.दुष्ट लोकांच्या दुष्ट कारवायाचा पाढा ऐकविला जातो.हा इतिहास युगानयुगे लोक ऐकतात आणि वाचतात, पण त्याचा स्वार्थी , संकुचित वृत्तीच्या मानवावर परिणाम झाला आहे का? असा नरसंहाराचा इतिहास वाचून त्यांना सद्बुध्दी सुचली पाहिजे, इतिहासाच्या ग्वाहीवर तिस-या युद्धावर पूर्ण विराम लावला पाहिजे.परंतु छे! हे करण्याऐवजी जगातील महाशक्ती युद्धाची भाषा बोलू लागले आहेत.हे कसले शांतीदूत, हे तर नरभक्षकच आहेत.

४.अ.पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

बागेतील झाडावर उमललेले एखादे टपोरे फूल असते.त्याचा सौम्यसा सुगंध आल्हाददायक असतो.त्याच्या नाजूक पाकळया आणि सुरेख रंग डोळयांना सुखवतात.हा छोटासा अनुभव घेतानाही आपले मन प्रसन्न होऊन जाते.इवल्याशा फांदीवर वा-याच्या लहरीवर डुलणारे ते फूल त्याच दिवशी संध्याकाळी कोमेजून जाते हे खरे; पण त्यामुळे त्याचे दिवसभरातील अस्तित्व आणि येणा-या जाणा-याला त्याने दिलेला आनंद या गोष्टी खोटया ठरू शकत नाहीत.आपणही आपले हे छोटेसे जीवन फुलासारखेच सुंदर करू शकतो.या नाशवंत जीवनाला त्याच्या अस्तित्वकालापुरता का होईना; पण काही अर्थ प्राप्त करून देऊ शकतो.तसे करण्यातच या जीवनाचे सार्थक आहे.या जीवनाचा प्रवास करत असताना आपल्या निकट राहून सोबत करणारी, आसपास राहून धीर पुरवणारी, आपल्यापेक्षा चार पावले चालत राहून प्रेरणा देणारी अशी निरनिराळया कोटीतील माणसे आपल्याला भेटतात.त्यांच्यापैकी काहींच्या सहवासामध्ये निरामय आनंदाचे क्षण लाभतात.आणखी कोणाच्या विचांरामधून अंत:करणाला काही दिलासा मिळतो आणि असामान्य विभूतींनी दाखवून दिलेल्या मार्गाच्या अल्पशा अनुकरणातून आपले जीवन उन्नत होते.या सा-या व्यक्तिंविषयी उन्नतीचा भाव ठेवणे हे जीवनातील एक कर्तव्य ठरते.त्यांचे स्मरण जागवणे हा त्यांच्या ऋणांतून काही प्रमाणात उतराई होण्याचा मार्ग आहे.

प्रश्नः

१.बागेतील फूल कोणती प्रेरणा देते? २

२.जीवनात कोणकोणती माणसे भेटतात? २

३.थोरांविषयी कृतज्ञता का दाखवायची? २

४.थोरांच्या ऋणांतून बाहेर येण्याचा मार्ग कोणता? २

५.वरील उता-यास योग्य शिर्षक दया. २

ब.खालील मुद्दयांच्या आधारे कथा लिहा व कथेला योग्य शीर्षक दया. १0

हलवायाचे दुकान-गरीब हमाल-दोन दिवसांचा उपाशी-मिठाईचा वास घेतो-मिठाईवाला पैशाची मागणी करतो-हमाल घाबरला-जवळच चाणाक्ष वकील-खिशातील नाणी वाजवतो-मिठाईच्या वासाची किंमत-मिठाईवाला ठप्प

५. (अ)पुढीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. १0

१)बाबूकाकांना प्रथम भेटताच लेखिकेच्या मनात कोणते विचार आले?
२)मुलाच्या मते, वडिलांनी मराठी भाषेमध्ये लिखाण करण्याचा प्रयत्न का करू नये?
३)तीन रूपयाच्या जीर्ण नोटा पाहून लेखकाच्या मनात कोणते विचार आले?

(ब)पुढीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. १0

१."शिरोडे आणि खांडेकर यांचे एकजीव कलम आहे."
२."पूर्वी पक्ष्यांची आणि आमची अम्गतपंगत असे."
३." माणूस म्हणजे एक मातीचेच घर नाही का?"

६. पुढीलपैकी <u>कोणत्याही दोन</u> अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा ६

१. सबाहयांभ्यंतरी | अवघा व्यापक मुरारी ||

२. 'संकटांनो, सावधान गाफील मी असणार नाही'

३. 'ही न्यूनता सुखाची चिन्ता सदा विदारी'

ब.खालीलपैकी कोणत्याही एका कवितेचे रसग्रहण करा. ४

१.सुंदर गाव
२.ढग उतरूनी आले

७.अ)सामान्यांच्या आयुष्याविषयी सदाशिवराव कोणते विचार मांडतात? ५

किंवा

लेखकाला बुरूजाविषयी शेवटी तुच्छता का वाटली?

ब)कानचिरीचे शब्दचित्र रेखाटा. ५